Impact Factor – 6.625 | Special Issue - 325 | June 2023 | ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REVIEWED, INDEXED AND REFEREED JOURNAL

## Two Day Interdisciplinary National Conference On

# India@75

Azadi Ka Amrit Mahotsav

- GUEST EDITOR -

**Dr. O. J. Rasal**
**Mr. S. S. Patel**

- CHIEF EDITOR -

**Dr. Dhanraj T. Dhangar**

- EXECUTIVE EDITORS -

**Mr. H. S. Shaikh**
**Mr. C. M. Gangawane**

For Details Visit To : www.researchjourney.net

Printed By : Academic Book Publications

Impact Factor – 6.625 ▪ Special Issue - 325 ▪ June 2023 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

**PEER REFREED AND INDEXED JOURNAL**

Two Day Interdisciplinary National Conference On

# INDIA @75

... Guest Editor ...

**Dr. O. J. Rasal**

**Mr. S. S. Patel**

... Chief Editor ...

**Dr. Dhanraj T. Dhangar**

... Executive Editors ...

**Mr. H. S. Shaikh**

**Mr. C. M. Gangawane**

... Jointly Organized by ...

*Pravara Medical Trust's,*

**Arts, Commerce & Science College, Shevgaon**

**Dist. Ahmednagar – 414502**

*Printed by :* Academic Book Publications

ISSN : 2348-7143
June 2023
RESEARCH JOURNEY Internationl Multidisciplinary E-Research Journal
*Impact Factor (SJIF) - 6.625 | Special Issue 325 : India@75*

# आधुनिक मराठी साहित्यातील कादंबरीचे बदलते प्रवाह

**रामदास पंढरीनाथ कातकडे**
मराठी विभाग, प्रवरा मेडिकल ट्रस्टचे आर्टस्, कॉमर्स् आणि सायन्स कॉलेज, शेवगाव.

**प्रस्ताविक**

*साहित्य व जीवनाचे अतूट नाते आहे. साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब असते. अनुभव, वेदना, संवेदनशीलता असे अनेक धागे एकमेकांमध्ये गुंफून साहित्य निर्माण होत असतं. एखाद्या अनुभवाकडे पाहण्याचा प्रत्येकाचा दृष्टीकोन वेगळा असतो, त्यामुळे त्याचे विविध हुंकार मनात उमटतात आणि मग हे साहित्य लेखणीतून उतरत जाते. साहित्य ही व्यापक संकल्पना आहे. साहित्य निर्माण करणारे व्यक्ती ही सर्व सामान्यापैकीच एक असते. मात्र जीवनातील अनुभव घेण्याची तिची दृष्टी आणि आपली दृष्टी यांमध्ये फरक असतो म्हणूनच टी लेखक व कवी बनते. सर्व सामान्य माणूस अत्यंत व्यावहारिक दृष्टीकोनातून भोवतालचे जग पाहत असतो. त्यातुनच त्याला आवडलेले, त्याने अनुभवलेले त्याच्या भावनांना कितपत व्यक्त करायचे याच्या मर्यादा आखून तो स्वतःचे लेखन करीत असतो. तसेच सत्य सृष्टीतून तो कल्पनाविश्व उभे करीत असतो.*

साहित्य म्हणजे शब्द आणि अर्थाचा मेळ होय. तो रसात्मक वाक्यातुन घेतला गेल्याने साहित्य ललित बनते. साहित्यामध्ये ललीतेत्तर आणि ललीतेत्तर साहित्य असे दोन भाग पडतात. ललित साहित्यात कल्पना, भावना लेखकाची अभिव्यक्ती व अनुभव व्यक्त होत असतात तर ललीतेत्तर साहित्यात वैचारिकतेला प्राधान्य दिले जाते. मराठी साहित्यातील विविध वाङ्मय प्रवाहांचा अभ्यास करत असताना प्राचीन साहित्य, अर्वाचीन साहित्य किंवा आधुनिक साहित्य आणि समकालीन साहित्य या तीन प्रकारांचा समावेश होताना दिसतो. साधारणपणे ११ व्या शतकापासून तर १८ व्या शतकापर्यंत प्राचीन मराठी साहित्याचा विचार होतो.[१] या कालखंडात महानुभाव संप्रदायाच्या साहित्याने सुरुवात होऊन वारकरी संप्रदायाच्या संत ज्ञानेश्वरांपासून तर संत रामदास यांच्या पर्यंत तसेच पंडिती साहित्यातील राम जोशी, प्रभाकर, होनाजी बाळा यांच्या साहित्य रचनेचा विचार होतो.

**आधुनिक साहित्य–**

आज भारतीय साहित्य अनेक भाषांमधून लिहिले जात असले तरी तिचे स्वरूप मात्र एकात्म आहे, कारण त्या साहित्याचा पाया हा भारतीय संस्कृती आहे. भारताच्या संदर्भात रवींद्रनाथ टागोर यांनी 'विश्वभारती' तर महाराष्ट्रात साने गुरुजींनी 'आंतरभारती' संकल्पना साधना सामाहिकातून स्पष्ट केली होती. भारतीय साहित्यात प्राचीन काळापासून मिथक, चिंतन, मूल्य अशा विविध अंगांनी समान परंतु समांतर अभिव्यक्ती होत आली आहे. त्यातुनच राष्ट्रीयतेचा विचार पुढे आला आहे.

आधुनिक मराठी साहित्याचा समकालीन, सामाजिक, स्थितीगतीशी अंतस्थ आणि खोलवरचा संबंध आहे. त्यामुळेच आधुनिक मराठी साहित्य आणि सामाजिकता यांचे आंतरसंबंध व आंतर्क्रिया सुविहितपणे निरखून तपासूनच या साहित्याचे आस्वादन व मुल्यांकन होऊ शकते. साहित्याचा सामाजिक अनुबंध लक्षात घेतल्याने ज्या मराठी समाजात अन संस्कृतीत हे साहित्य निर्माण होत आहे आणि त्यांचा साहित्य निर्मितीवर पडलेला प्रभाव यामुळे साहित्याकडे आता केवळ कलात्मक निर्मिती म्हणून न पाहता 'एक सामाजिक सांस्कृतिक घटना' म्हणून पाहणे गरजेचे आहे.[२]

इ.स.१८२० ते १८७० पर्यंतचा पन्नास वर्षाचा मराठी वाङ्मयाचा काळ हा आधुनिक मराठी वाङ्मयाच्या पूर्व तयारीचा काळ होय. इ.स.१८७५ पासून मराठी साहित्याला आधुनिकता प्राप्त होत गेली असे आपण मानतो. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंध मालेतील निबंध, हरिभाऊ आपटे यांची कथा-कादंबरी, केशव सुतांची कविता, किर्लोस्करांची नाटके हे मराठी साहित्याच्या आधुनिकतेचे पहिले उन्मेष मानले जातात.

आधुनिकता मराठी साहित्यात १८७५ नंतरच्या पंचवीस-तीस वर्षात नीटपणे प्रस्थापित झाली. आधुनिकतेची अनेक वैशिष्टे आहेत. त्यातील आधुनिकतेचे प्रमुख आशय वैशिष्टे म्हणजे सामाजिक वर्तमान वास्तवाच्या आणि भौतिक जीवनाच्या प्रखर जाणिवेचा वाङ्मयातील अविष्कार होय. या सामाजिक वास्तवाची व्याप्ती किती होती? कोणत्या मराठी समाजाची संवेदना या मराठी साहित्यात प्रतिबिंबित होत होती? असे आणि यांसारखे कितीतरी प्रश्न त्यावेळच्या मराठी साहित्याच्या संदर्भात उपस्थित होतात. त्यांचे थोडक्यात उत्तर असे मिळते की, या काळात आपण पुढे १९२० नंतरही आधुनिक मराठी साहित्य समृद्ध आणि विविधतापूर्ण झाले असले तरी मराठी समाजातील मुठभर उच्चवर्णीयच त्याची निर्मिती करीत होते. साहित्यिक कोणत्याही वर्गाचा, वर्णाचा, जातीचा असला तरी तो प्रतिभावंत असल्यामुळे त्याची वाङ्मयीन जाणिवही त्यांच्या सर्व समाजाला मानसिकदृष्ट्या व्यापून राहणे आवश्यक असते तरच त्याचे साहित्य त्या समाजाचे प्रतिनिधित्व करू शकते. असे असले तरी मुठभरांच्या संकुचित जाणिवांच्या साहित्याला सर्व आधुनिक मराठी समाजाच्या साहित्याचे प्रतिनिधित्व दिले जात होते आणि त्या अर्थाने त्याला मराठी साहित्य ही संज्ञा वापरली जात होती.

**आधुनिक मराठी साहित्यातील कादंबरीचे बदलते प्रवाह-**

मराठी साहित्यातील एक समृद्ध दालन म्हणजे मराठी कादंबरीचे विश्व होय. लेखकांनी कादंबरीच्या माध्यमातून विविध विषय हाताळले. तत्कालीन समाज जीवनाचे यथार्थ दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला.

त्याकाळी सामाजिक आणि राष्ट्रीय पातळीवर ज्या लाटा उसळल्या त्या लाटांचे चित्रण केले आहे. त्यातूनच मराठी कादंबरीचे विश्व विस्तारले. महत्वाचे म्हणजे सदाशिव पेठी वातावरणातून कादंबरी बाहेर पडली अन शे-सव्वाशे वर्षात ती खेडेगावातील शेतमजुराच्या गोठ्यापर्यंत पोहचली. कादंबरीचे हे बदलते विश्व खरोखरच मनाला आगदी भुरळ घालणारे ठरले आहे. कादंबरी हा आधुनिक काळात उदयाला आलेला प्रकार मनाला जात असला तरी त्याची पाळेमुळे प्राचीन वाङ्मयात सापडतात. समाजपरिवर्तन जसजसे होत गेले तसा काळ ही बदलू लागला. त्याचबरोबर माणसांच्या विचारांमध्ये परिवर्तन होत गेले. या साऱ्यांचा परिणाम कादंबरीबरोबरच सर्व साहित्यावर देखील झाला.

कादंबरी सभोवतालच्या जीवनातील घटना-घटकातून आकारास येत असते. कादंबरी जीवनाचा शोध तर घेत असतेच पण त्याचबरोबर आत्म्याचाही शोध घेत असते. कादंबरी ही काही घटना तसेच पात्रांच्या सहाय्याने जीवनाचा व मानवी मनाचा शोध घेत असते. साहित्य विश्वातील प्रधान साहित्य प्रकार म्हणून ओळखला जाणारा 'कादंबरी' हा वाङ्मय प्रकार आधुनिक काळात उदयाला आला आहे. मराठी कादंबरीच्या उदयापासून मराठी कादंबरी ही विविध टप्प्यातून आपला प्रवास करीत आली आहे. कादंबरीचा विकास जसजसा होत गेले. या प्रवाहांना बरोबर घेऊनच मराठी कादंबरीचे विश्व चढ-उताराने विस्तारत गेले. मराठी कादंबरी वाङ्मयाचा पाया हरीकेशवजी पठारे यांनी 'यांत्रिकीकरण' या भाषांतरीत कादंबरीने रचला. 'बनियनच्या' 'पिलग्रिम्स प्रोग्राम' या ग्रंथाचे मराठीत भाषांतर इ.स.१८४१ मध्ये केले. येथूनच मराठी कादंबरीचा प्रवाह वाहत राहिला आहे.

मराठी कादंबरी हा साहित्यप्रकार प्रारंभापासून अनेक वाटा-वळणे घेत विकसित होत गेला असला तरी प्रत्येक काळाचे सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्न मराठी कादंबरीने अगदी प्रभावीपणे मांडलेले आपल्याला दिसून येते. समाज व्यवस्थेची घडी ही कधीच स्थिर आणि एकपदरी नसते. तिच्यात नेहमीच स्थित्यंतरे होत असतात. सामाजिक स्थित्यंतराबरोबरच कादंबरीचे आशयविश्व काळानुरूप बदलत असते.[३] १९६० नंतर मात्र समाज जीवनामध्ये विविधांगी सर्व पातळ्यांवर स्थित्यंतरे जाणवू लागली होती. या स्थित्यंतरांचे प्रतिबिंब या काळातील कादंबरीत प्रतिबिंबित झालेले दिसते. मात्र २००० नंतरच्या काळाचा विचार करता १९६० ते २००० पर्यंतचा काळ हा काहीसा स्थिर आणि फारसा भयावह नव्हता असे म्हणता येईल. म्हणजे २००० पूर्वीच्या काळात समाज जीवनात कोणते बदल, ताण-तणाव, संघर्ष जाणवत नव्हते असे म्हणता येणार नाही. फक्त या काळातील सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतराची गती मात्र अतितीव्र नव्हती एव्हढेच !

१९७५ च्या सुमारास ग्रामीण साहित्य चळवळ सुरु झाली. दलित साहित्यापाठोपाठ झालेला हा आणखी एक सांस्कृतिक उद्रेक होता. ज्या सामाजिक अपरिहार्यतेतून दलित साहित्य चळवळीचा उदय झाला तीच सामाजिक परिस्थती ग्रामीण साहित्य, जनवादी साहित्य, आदिवासी साहित्य या चळवळीना कारणीभूत ठरली. स्वातंत्र्योत्तर काळातील सार्वत्रिक शिक्षणामुळे ग्रामीण बहुजन समाजात सांस्कृतिक चलनवलनास प्रारंभ झालेला होता. परिवर्तनवादी चळवळी गतिमान झालेल्या या काळात ग्रामीण साहित्याने ही आपली भूमिका स्पष्ट केली. आणि येथेच ग्रामीण साहित्य चळवळ सुरु झाली. ग्रामीण कादंबरीचा हा प्रवाह पुढे वाहता ठेवण्यासाठी महत्वाचे कार्य अनेक कादंबरीकारानी केले आहे.[४] त्यामध्ये आनंद यादव 'कागुद' आणि 'सावली' (१९८६), पुरुषोत्तम बोरकर 'मेन इन इंडिया' (१९८७), बाबाराव मुसळे 'हाल्या हाल्या दुधू दे' (१९८५), नागनाथ कोत्तापल्ले 'उलट चालीला प्रवाहो, (१९८५), राजन गवस 'चौडक' (१९८५), विश्वास पाटील 'झाडाझडती' इत्यादी कादंबऱ्यातुन ग्रामीण जीवनातील ताण-तणाव स्थित्यंतरे प्रकट केली आहेत. त्याचबरोबर बाबा भांड 'जरंगा' (१९७८), काजोळ (१९८४), नामदेव ढसाळ 'हाडकी हाडवळ', विजय सिरसाठ 'काळगर्भ', रंगनाथ पठारे 'ताम्रपट', रंगराव पाटील 'दंश' (१९८७) इत्यादी कादंबऱ्यातुन ग्रामीण जीवनातील वास्तवाचे यथार्थपणे दर्शन घडविले आहे. आजच्या ग्रामीण साहित्य अभ्यासकांनी ग्रामीण कादंबरीचा सखोल अभ्यास करुन तिचे वेगळेपण दाखविले आहे आणि एक नवे परिमाण प्राप्त करुन दिले आहे. या संदर्भात रविंद्र ठाकूर लिहितात - "मराठी ग्रामीण कादंबरी 'कादंबरी' या साहित्य प्रकारच्या प्रकृतीचे भान अगदी सुरुवातीपासून बाळगण्याचा प्रयत्न केले आहे.

सन २००० नंतरचे पहिले आणि दुसरे दशक मात्र अनेक सामाजिक प्रश्न घेऊन आलेले दिसते. समाजजीवनात प्रचंड उलथा-पालथ घडविणारे ठरले आहे. अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्न या काळात धारदार आणि टोकाचे बनलेले दिसतात. भाषेच्या आस्मिततेचा आणि अस्तित्वाचा प्रश्न, धर्म, जात-वर्ग, प्रदेशाचे प्रश्न, वाढती गुन्हेगारी, भोगवादी, चंगळवादीवृत्ती, पर्यावरणाचे प्रश्न, सायबर क्राइम, शेतकऱ्याच्या वाढत्या आत्महत्या, नपुंसक शिक्षण व्यवस्थेचा दिखाऊपणा, राजकारण्याची स्वार्थी व भ्रष्टाचारी प्रवृत्ती, आरक्षणाच्या मागणीसाठी निघालेले विविध मोर्चे, धर्मा-धर्मात वाढणारी तेढ, असहिष्णुतेचा प्रश्न, कोपर्डी निर्भयासारखी दुदैवी घटना त्यातून पुढे आलेला स्त्रियांवरील आत्याचाराचा व सुरक्षिततेचा प्रश्न, विस्थापित बांधवांचा वाढता आक्रोश, दहशतवाद, नक्षलवाद, वाढती भांडवलशाही वृत्ती 'सेझ' सारख्या परदेशी कंपन्यांनी निर्माण केलेली शोषण परंपरा समाज जीवनात प्रचंड ढवळा-ढवळ करुन गेली. या ढवळा-ढवळीचे पडसाद २००० नंतरच्या कादंबरीत पडलेले दिसतात.

सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' (२००२) या कादंबरीतून अस्मानी-सुलतानी संकट परंपरांच्या तावडीत सापडून ऱ्हास पर्वाकडे वाटचाल करणाऱ्या संबंध कृषीव्यवस्थेचा घेतलेला आढावा अस्वस्थ करणारा आहे. हरितक्रांतीचे गोड-आंबट अनुभव चाखलेल्या शेतकऱ्याला जागतिकीकरणामुळे किती मोठ्या शोषणाला व स्थित्यंतराला सामोरे जावे लागले ते तपशिलासह कादंबरीत मांडले आहे. तसेच प्रविण दशरथ बांदेकर यांच्या 'चाळेगत' (२००९) या प्रयोगशील कादंबरीने कोकण प्रदेशातील 'भुईजड' झालेल्या तरुण

पिढीची शोकांतिका अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्न करते. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' (२०११) या आनंद बिंगकर याच्या कादंबरीने जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर शोषणव्यवस्थेच्या अग्रस्थानी सापडलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्याच्या जीवनमरणाचा प्रश्न आणि त्यांचे धोक्यात आलेले सामाजिक स्थान या कादंबरीत मांडलेले आहे.

'जोहर' (२००५) या सुशील धसकटे लिखित कादंबरीत अलीकडे प्रसिध्द झालेल्या आणि चर्चेचा विषय ठरलेल्या कादंबरीत शेवटच्या पानापर्यंत शहर आणि ग्रामीण अशी नैसर्गिकपणे हिंदकळत जाते. गावपण, माणूसपण, मुल्ये संपूर्णतः नष्ट होण्याचा संघर्ष त्याचबरोबर नपुंसक शिक्षणव्यवस्था, बदलते ग्रामजीवन, भ्रष्ट प्रसारम ाध्यमे ह्या संबंध व्यवस्थेचा कॅनव्हास जोहरमध्ये चितारला आहे.[५] डॉ. जनार्धन वाघमारे यांची 'बखर एका खेड्याची' (२००५) ही कादंबरी एक सर्वसाधारण खेडे हेच ह्या कादंबरीचे नायकत्व स्वीकारते. या कादंबरीत गतकालीन घटनांना केंद्रस्थानी ठेऊन एक स्मरणचिंतन व्यक्त झाले आहे.[६] 'धूळमाती' (२०१४) कृण्णांत खोत यांच्या कादंबरीत गावठामध्ये पन्हाळ्याच्या परिसरात घडणाऱ्या जीवनाचं दर्शन तिथल्या बोलींसह साक्षात उभं राहतं.[७] 'कोलाज संभ्रमाचे वर्तमान' (२०२३) या अशोक लिंबेकर लिखित आजच्या कादंबरीमध्ये समाजातल्या अनेक छोट्या-मोठ्या व्यवस्था पोखरल्या जात असताना धर्म, जात, पक्ष यांचे झेंडे नाचवत कोलाहाल करणाऱ्या आंधळ्या समूहांचे आवाज टिपेला पोहचलेले असताना संवेदनशील माणसांनी परस्परांना घातलेली हाक या कथानकातून ऐकू येत आहे. ही कादंबरी म्हणजे मुल्यऱ्हासाचं दुःख सोसणाऱ्या माणसांची उमेद टिकवून ठेवण्याची धडपड आहे. आतला दिवा विझू न देण्याचा प्रयत्न आहे. जीवनहितैषी गोष्टींना धरून ठेवण्याचा निकराचा अट्टाहास आहे. समकालीन कादंबरीत स्वतःचं स्वतंत्र स्थान निर्माण करू पाहणारे हे 'संभ्रमाचे वर्तमान' एक संवेदनशील आणि समंजस लेखन आहे.

**समारोप :**

सन २००० नंतरच्या मराठी कादंबरीने समाज, संस्कृती, राजकारण, अर्थ, भाषा, धर्म आणि मूल्य या घटकांच्या अनुषंगाने अनेक प्रश्न मांडलेले दिसतात. २००० नंतरच्या काळात लिहिल्या गेलेल्या कादंबऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. इथे विवेचनासाठी मोजक्याच कादंबऱ्याचा विचार केलेला आहे. या काळात झपाट्याने बदलणारे समाज जीवन आणि सांस्कृतिक स्थित्यंतरामध्ये विविध प्रश्न, ताण-तणाव, संघर्ष, क्रिया-प्रतिक्रिया टिपताना कादंबरीकाराची कसरत लागते.

**संदर्भ :**

१. स्वातंत्र्योत्तर वाङ्मयीन प्रवाह : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, पुनर्मुद्रण २०२०, पृ.क्र.०२, ०९.
२. मराठी कादंबरी तंत्र आणि विकास : प्रा.बापट गोडबोले, व्हिनस प्रकाशन पुणे, तिसरी आवृत्ती १९९३, पृ.क्र.२२४.
३. कादंबरीची रचना : प्रा.श्री.मा. कुलकर्णी, उन्मेष प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती १९५६, पृ.क्र.१५.
४. साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह : डॉ.शरणकुमार लिंबाळे, प्रस्तावना पृ.क्र.७.
५. जोहर : सुशील धसकटे, अक्षरवाङ्मय प्रकाशन पुणे, पहिली आवृत्ती २०१५, पृ.क्र.१९१.
६. बखर एका खेड्याची : जनार्धन वाघमारे, पद्मगंधा प्रकाशन पुणे, पहिली आवृत्ती २००५, पृ.क्र.८.
७. धूळमाती : कृण्णात खोत, मौजे प्रकाशन, मुंबई, पृ.क्र.७७.

●●●

Organized by

Pravara Medical Trust's,

## Arts, Commerce & Science College,

Shevgaon, Dist. Ahmednagar, (M.S.) India



**Publisher & Printer**


## Academic Book Publications

Dyandeep Apartment, Plot No. 2, Chaitanya Nagar,
Opp. Progressive English Medium School, Jalgaon - 425 001.
**Ph.:** (0257) 2235520, 2232800. **Mob.:** 93092 60560

**E-mail : academicbooksjalgaon@gmail.com**

Price : ₹ 1000/-